# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०८/ २०१२** **दिनांक २८.०५.२०१२**

**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

प्रसादालय, मंदीर व कॅन्टीन विभागासाठी ०४ महिन्यांकरिता किराणा मालाचे प्राप्त झालेले नमुने निवडणेकामी श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा सोमवार दि.२८.०५.२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात (साईनिवास अतिथीगृहात) आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं. एसएसएस-वशी-०४-८०१-२०१२, दिनांक २३ मे,२०१२ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविण्यात आले होते.

तसेच, किराणा मालाचे प्राप्त झालेले नमुने निवडणेकामी तज्ञ म्हणून दोन प्रतिनिधी पाठविणेबाबत, मा.डॉ. हरिभाऊ मोरे, अधिष्ठाता कृषि, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी यांना जा.नं.एसएसएस-वशी-०४-८०२-२०१२,दि.२३ मे,२०१२ चे पत्राने कळविण्यात आले होते.

त्यानुसार सदरहू सभा सोमवार दि.२८.०५.२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहात सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. श्री.किशोर मोरे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती नसल्याने अर्धा तास वाट पाहून सभेचे कामकाज श्री.किशोर मोरे, कार्यकारी अधिकारी, यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

यानंतर विषय पत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरू करणेत आली.

**विषय नं. ०१** **प्रसादालय, मंदिर, कॅंटीन या विभागासाठी चार महिन्यांकरीता किराणा माल, खरेदीकामी प्राप्त झालेले नमुने निवडणे.**

**प्रस्ताव-** सन २०१२ (जुन-१२ ते सप्टेंबर-१२) साठी प्रसादालय, मंदिर व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक किराणा माल निविदा मागवून खरेदी करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९.०५.२०१२ रोजी झालेल्या त्रीसदस्य सभेमध्ये मान्यता दिली आहे. त्यानुसार दि.१२-१३.०५.२०१२ चे १.दै.टाईम्स ऑफ इंडिया-सर्व आवृत्त्या २.दै.इंडियन एक्सप्रेस - सर्व आवृत्त्या ३.दै.महाराष्ट्र टाईम्स - मुंबई आवृत्ती, ४.दै.सकाळ - पुणे आवृत्ती ५.दै.लोकमत - जळगांव व औरंगाबाद आवृत्ती ६.दै.गावकरी - नाशिक आवृत्ती अशा ०२ नॅशनल व ४ मराठी भाषिक वर्तमानपत्रात किराणा माल निविदा विक्रीबाबत जाहिरात प्रसिद्ध करुन दि.१४.०५.१२ ते दि.२३.०५.१२ अखेर निविदा विक्री करणेत येऊन दि.२६.०५.१२ अशी निविदा व नमुने स्विकारणेची अंतिम मुदत ठेवणेत आलेली होती. मुदतीअंती मुंबई कार्यालयात ०२ व शिर्डी कार्यालयात ५० अशा एकुण ५२ निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

वरीलप्रमाणे किराणा मालासाठी निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविणेत आलेल्या असून क्र.१ चे लिफाफ्यात मुळ निविदा व क्र.२ चे लिफाफ्यात बयाणा रकमेचा डी.डी.अथवा रोखीची भरणा पावती व इतर कागदपत्रांची तसेच स्वतंत्र पॅकींगमध्ये नमुन्यांची मागणी केलेली आहे.

सदर निविदे सोबतचा लिफाफा क्र.२ खरेदी विभागाकडील दि.२४.०५.२०१२ रोजीचे मंजुर टिपणीनुसार दि.२७.०५.२०१२ रोजी उघडण्यात येऊन त्यातील निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांचा तक्ता सोबत सादर केलेले आहे.

प्राप्त निविदाधारकांच्या नमुन्यांमधून योग्य प्रतीचे नमुने निवडणेकामी मा.त्रीसदस्य समितीने सुचविलेनुसार राहुरी कृषी विद्यापीठ, राहुरी येथील फुड सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी विभागाचे इनचार्ज व सहा.प्राध्यापक यांची गठित केलेल्या तज्ञ समितीस इकडील जा.क्र.एसएसएस-वशी४/८०२/२०१२ दि.२३.०५.२०१२ अन्वये दि.२८.०५.२०१२ रोजी किराणा मालाचे नमूने निवडणेस उपस्थित राहणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

सन २०१२ (जुन-१२ ते सप्टेंबर-१२) साठी प्रसादालय, मंदिर व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक किराणा मालासाठी प्राप्त निविदांसोबत निविदासादरकर्त्यांनी सादर केलेल्या मालांच्या नमुन्यांच्या पिशव्यांचे आयटेमवाईज सॉर्टींग करण्यात आले. त्यानंतर मोठ्या प्लॅस्टिक पिशव्या आणून त्यामध्ये मालाच्या पिशव्या ठेवण्यात आल्या. त्यानंतर सदर पिशव्या सभेपूढे उघडून खरेदीसाठी स्विकारार्ह असे खालीलप्रमाणे नमूने मा.त्रीसदस्य समितीचे सदस्य मा.श्री किशोर मोरे, कार्यकारी अधिकारी व गठित केलेल्या तज्ञ समितीचे श्री विक्रम कड, ऑफीस इनचार्ज, पास्ट हार्वेस्ट टेक्नॉलॉजी, डॉ.पी.एम.कोटेचा, सहा.प्राध्यापक डिपार्टमेंट ऑफ फूड सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी, श्री पी.बी.बोरावके, विशेष कार्य अधिकारी, श्री दिलीप बाबासाहेब सांबारे, आचारी व श्री प्रल्हाद गोरक्षनाथ कर्डीले, आचारी मार्फत निवडणेत आले.

| अ.क्र. | मालाचा तपशिल | पुरवठा करावयाचे अंदाजे परिमाण क्विंटलमध्ये | एकुण नमुन्यांची संख्या | निवडलेले नमुने संख्या | कागदपत्रांची पुर्तता नसल्याने - नाकारण्यात आलेली नमुने संख्या | नापसंत नमुने संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| **परिशिष्ठ अ** | | | | | | |
| १ | गहु, ४९६, २१८९ | ४,३०० | १८ | ५ | ० | १३ |
| २ | हरबरा, गावरान | ३५० | ९ | ३ | ० | ६ |
| ३ | मोहरी | १६ | ९ | ३ | ० | ६ |
| ४ | सफेद तिळ | ३ | १० | ३ | ० | ७ |
| ५ | मेथी | ०.८० | ५ | ३ | ० | २ |
| ६ | खिसमिस | ७५ | १४ | ३ | ० | ११ |
| **परिशिष्ठ ब** | | | | | | |
| १ | साखर,स्पेशल एम ३०/ एस ३० | ४,६०० | ५ | ५ | ० | ० |
| **परिशिष्ठ क** | | | | | | |
| १ | तांदुळ, सोना मसुरी (आंध्रा) जुना | ३,००० | २२ | ५ | १ | १६ |
| २ | हरबराडाळ, बिगर पॉलीश | २,३३० | २९ | ४ | ० | २५ |
| ३ | तुरडाळ, लातुर फटका | ६६० | ३१ | ५ | ० | २६ |
| ४ | मुगडाळ, बोल्ड | ८० | १८ | ४ | ० | १४ |
| ५ | उडीददाळ - सफेद | ०.६० | ५ | ३ | ० | २ |
| ६ | वाटाणा, हिरवा, इंम्पोर्टेड | २०० | १५ | ३ | ० | १२ |
| ७ | मुग, आख्खा | ३०० | १९ | ३ | ० | १६ |
| ८ | मठ | ३०० | २३ | ३ | ० | २० |
| ९ | रवा, मध्यम | २४० | ११ | ५ | ० | ६ |
| १० | मैदा | २७० | १० | ३ | ० | ७ |
| ११ | हिरा बेसन | २.५० | ३ | ३ | ० | ० |
| १२ | गुळ, कोल्हापूरी, पिवळा | ८० | ९ | २ | ० | ७ |
| १३ | शेंगदाणा, वाळलेला, बोल्ड | १७० | ९ | ३ | ० | ६ |
| १४ | साबुदाणा, सेलम, डबलहत्ती, मिल्कव्हाइट | १६० | १३ | ३ | ० | १० |
| १५ | भगर | ३ | ४ | ३ | ० | १ |
| १६ | खोबरेवाटी, राजापुरी, काळी पाठ | ४३ | ७ | ३ | ० | ४ |
| १७ | काजु पाकळी, २ पाकळी वाळलेली | ८३ | ११ | ३ | ० | ८ |
| १८ | मगज बी | ८ | ७ | ३ | ० | ४ |
| १९ | बदाम बी, मोठी साईज | ०.३० | ४ | ३ | ० | १ |
| २० | हळद, अखंड वाळलेली | ३८ | १५ | ३ | ० | १२ |
| २१ | मिरची - गुंटूर, अखंड, लाल | ५८ | ८ | ३ | ० | ५ |
| २२ | धने, अखंड | ५३ | १४ | ३ | ० | ११ |
| २३ | हिरवी विलायची, बोल्ड | २१ | १६ | ३ | ० | १३ |
| २४ | जीरे, डायमंड कट | १८ | १६ | ३ | ० | १३ |
| २५ | सुंठ, वाळलेली | १.३० | ८ | २ | ० | ६ |
| २६ | शहाजिरे | ०.६० | ६ | ३ | ० | ३ |
| २७ | मसाला विलायची | ०.६० | ६ | ३ | ० | ३ |
| २८ | लवंग | ०.५० | ६ | ३ | ० | ३ |
| २९ | दालचिनी | ०.६० | ७ | ३ | १ | ३ |
| ३० | खसखस | १.३० | ६ | ३ | ० | ३ |
| ३१ | काळे मिरे | ०.५० | ५ | ३ | ० | २ |
| ३२ | नाकेश्वर | ०.६० | ३ | ३ | ० | ० |
| ३३ | तेजपान | ०.६० | ५ | ३ | ० | २ |
| ३४ | दगडफुल | ०.३० | ४ | ३ | ० | १ |
| ३५ | चक्रीफुल | ०.६५ | ५ | ३ | ० | २ |
| ३६ | जायफळ | ०.१० | ३ | ३ | ० | ० |
| ३७ | जायपत्री | ०.६५ | ६ | ३ | १ | २ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३८ | बडीशोप, हिरवी बारीक | २.३० | ७ | ३ | ० | ४ |
| ३९ | पापड, लिज्जत, डायमंड कट | २५ | ६ | ४ | ० | २ |
| ४० | हिंग पावडर, एलजी/नागछाप | ५ | ८ | ४ | १ | ३ |
| ४१ | हिंग खडा, एलजी/नागछाप | ०.५० | ३ | २ | ० | १ |
| ४२ | कच्चे पोहे | ३ | ७ | ३ | ० | ४ |
| ४३ | भाजके पोहे | ८ | १ | १ | ० | ० |
| ४४ | डाळया | २ | ५ | ३ | ० | २ |
| ४५ | चिंच, फोडलेली | ५ | ७ | ३ | ० | ४ |
| ४६ | आमसुल | ७ | ५ | २ | ० | ३ |
| ४७ | जिलेबी रंग, बुश बोक/मार्सा | १ | १ | १ | ० | ० |
| ४८ | सुतळी, बारीक, थ्री प्लाय | २ | २ | २ | ० | ० |
| ४९ | पत्रावळ प्लो, कटींग, कच्ची बदाम | ५८,००० नग | २ | १ | ० | १ |
| ५० | पत्रावळ चार कप्पयाची, थर्माकोल | ५,००,००० नग | ४ | २ | ० | २ |
| ५१ | खडे मिठ | १३ | ४ | २ | ० | २ |
| ५२ | मीठ, फ्रि फ्लो, आयोर्डाईज्ड,<br>अन्नपुर्णा, कॅप्टन कुक, टाटा इ. | ३३३ | ६ | ६ | ० | ० |
| ५३ | मसुर - आख्खा | १३० | १३ | ५ | ० | ८ |
| ५४ | मठदाळ | ३३ | ११ | ३ | ० | ८ |
| ५५ | कुंकु | १.५० | १ | १ | ० | ० |
| ५६ | **खादयतेल,** सुर्यफुल/मका<br>रिफाईड, ॲगमार्क<br>१५ किग्रॅ.नवीन डबा पॅकिंग | १,१६० | ८ | ६ | ० | २ |
| ५७ | **वास्पती तुप**<br>जेमिनी/राग ब्रॅण्ड<br>१५ किग्रॅ.नवीन डबा पॅकिंग | १६० | ९ | ९ | ० | ० |
| ५८ | **चहा पावडर**<br>टाटा/ब्रुकबॉण्ड/सपट/सीटीसी | ७० | ९ | ९ | ५ | ४ |
| ५९ | **कॉफी फ्लिटर**<br>ब्रुक बॉण्ड, कॅफे, गोल्ड | ५.५० | १ | १ | ० | ० |
| ६० | **बिस्कीटे**<br>ग्लुकोज ८८/९०/१०० ग्रॅम<br>पार्ले/ब्रिटानिया/सनफिस्ट | २,८४,००० नग किंवा आवश्यकतेनुसार | ४ | ४ | ० | ० |
| ६१ | ग्लुकोज २२०/२५० ग्रॅम<br>पार्ले/ब्रिटानीया/सनफिस्ट | १,१०,००० नग किंवा आवश्यकतेनुसार | ४ | ४ | ० | ० |
| ६२ | मॉंको/सॅक्स/सेकी<br>पार्ले/ब्रिटानीया/सनफिस्ट | १,००,००० नग किंवा आवश्यकतेनुसार | ४ | ४ | ० | ० |
| ६३ | क्रॅकजॅक/५०-५०/<br>स्वीट ॲण्ड सॉल्ट<br>पार्ले/ब्रिटानीया/सनफिस्ट | ७३,००० नग किंवा आवश्यकतेनुसार | ४ | ४ | ० | ० |
| ६४ | मारी गोल्ड<br>पार्ले/ब्रिटानीया/सनफिस्ट | ७०,००० नग किंवा आवश्यकतेनुसार | ४ | ४ | ० | ० |
| **पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर**<br>आयएसआय प्रमाणित | | | | | | |
| ६५ | १ लिटर बाटली | २,३९,००० नग किंवा आवश्यकतेनुसार | ८ | ७ | ३ | ४ |
| ६६ | ५०० मिली बाटली | ४३,००० नग किंवा आवश्यकतेनुसार | ८ | ७ | ३ | ४ |
| ६७ | **पॉलीकप**<br>व्हर्जीन फुड ग्रेड<br>१०० मिली क्षमता<br>वजन २ ग्रॅम | ५७००००० नग किंवा आवश्यकतेनुसार | १ | १ | ० | ० |
| | **प्लॅस्टीक पिशवी** | **क्विंटल** | | | | |
| ६८ | साईज ४"x ६"<br>व्हर्जीन फुड ग्रेड,१०० गेज, एलडी | १३ | ४ | ४ | ० | ० |
| ६९ | साईज ५"x ६.५"<br>(लाडू पिशवी) | १४० | ४ | ४ | ० | ० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | छपाईसह ४ रंगात<br>व्हर्जीन फुड ग्रेड, २०० गेज, पी.पी. | | | | | |
| ७० | साईज ८"x १०"<br>छपाईसह १ रंगात<br>व्हर्जीन फुड ग्रेड, १०० गेज, एलडी | ५३ | ४ | ४ | ० | ० |
| ७१ | **गाय दूध**<br>होमीजीनाईज्ड व पाश्चराईज्ड<br>३.५ फॅट, ८.५ एसएनएफ<br>**टोड दुध**<br>३.० फॅट, ८.५ एसएनएफ | अंदाजे ३,४०० लिटर दररोज गरजेनुसार | | | | |
| ७२ | **गावरान तुप**<br>१५ किग्रॅ.नवीन डबा पॅकींग<br>**ॲगमार्क असलेले** | २,४३० | १५ | १३ | ० | २ |

**निर्णय क्र. ३९८ यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त निवडण्यात आलेल्या नमुनेधारकांना व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात येऊन अंतिम निर्णय घेण्यात यावा.**

**तसेच, निविदेमध्ये नमुद केलेल्या कागदपत्रांची पुर्तता न करणाऱ्या खालील निविदाधारकांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलाविणेत येऊ नये, असे ठरले.**

**१. शिवसाई सर्व्हीसेस, शिर्डी**
**२. श्री साई समर्थ एजन्सी, शिर्डी**
**३. चिरायु फुड ॲण्ड बेव्हरेज, पुणे**
**४. राजेश फुड प्रॉडक्टस, अहमदनगर**
**५. कुणाल टी सेंटर, शिर्डी**
**६. शुभलक्ष्मी मिनरल्स, औरंगाबाद.**

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

---

वरील निर्णय क्र. ३९८ ते ३९८ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(किशोर मोरे)
कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी